# ई - पोलीस पत्रिका

दि १९/०५/२०२०

अनु.क्र..१४

## (अमरावती शहर पोलीसांची २०२० ची उद्दिष्टे)

- जागरूक व तत्पर पोलीस.
- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू

## शिक्षा/निलंबन/पुन:स्थापना/बांक्षस

**१.क्र.पोआअ/ विचौ-२/कसुरी /गैरहजर/आदेश/पोशि-१८१०राठोड/२०२०/२७५७ अम.शहर दि. २०/०४/२०२०**

### आदेश

तुम्ही पोशि/१८१० इंदल राठोड, पोस्टे सिटी कोतवाली, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन तुम्ही दि. ०६.०१.२०२० ते १८.०२.२०२० पावेतो एकुण ४६ दिवस वरिष्ठाना कोणतीही पूर्व सुचना न देता परस्पर स्वमर्जीने गैरहजर राहिले असल्याचे सकृत दर्क्षने दिसुन आले आहे. सदरची बाब अतिशय गंभ् ीर असुन पोलीस खात्यास अशोभनिय आहे. करिता सदरचा गैरहजर कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मध्ये नियम क्रमांक ६३ (६ ) चे तरतुदीनुसार **दि. ०६.०१.२०२० ते १८.०२.२०२० पावेतो एकुण ४३ दिवस असाधारण रजा ( विनावेतन)** मंजुर करण्यात येत आहे.

00000

**२.क्र.पोआअ/ विचौ-२/ कसुरी/गैरहजर/ आदेश/पोशि-१४१६ लायबर/२७६३/२०२० अम.शहर दि. २०/०४/२०२०**

### आदेश

पोशि/१४१६ निलेश लायबर (मयत), पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांचा उपचारा दरम्यान मूत्यु झाल्याने त्यांचा दि. २०.०२.२०२० ते २७.०२.२०२० पावेतोचा एकुण ०८ दिवसाचा गैरहजर कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मध्ये नियम क्रमांक ६१ चे तरतुदीनुसार **परावर्तित रजा** मंजुर करण्यात येत आहे.

००००

**३.क्रमांक:पोआअ/विचौ-२/कसुरी/गैरहजर/आदेश/स. कर्मचारी/गवई/२७६५/२०२० अमरावती दिनांक २०.०४.२०२०**

### आदेश

पुर्णकालीन सफाई कामगार , धिरज गवई , पोलीस मुख्यालय , अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन तुम्ही दिनांक ०५.०२.२०२० ते १०.०२.२०२० पावेतो ०६ दिवस वरिष्ठांना कुठलिही पूर्वसुचना न देता कर्तव्यावर अंत्यात निष्काळजीपणे बेजबाबदारपणे गैरहजर राहुन गैरशिस्तिचे वर्तन केले आहे.

करिता तुमचा गैरहजर कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्रमांक ६३ (६) चे तरतुदीनुसार **दि. ०५.०२.२०२० ते १०.०२.२०२० रोजी पावेतो एकुण ०६ दिवस असाधारण रजा ( विनावेतन)** मंजुर करण्यात येत आहे.

०००००

**४.क्र.पोआअ/ विचौ-२/ कसुरी /अंतिम आदेश/ मपोशि-३६३ सानप+२/२०२०/२८०४ अमरावती दि.२२.४.२०२०**

## आदेश

**वाचा :-** या कार्यालयाचे कादानो क्रं.-पोआअ/विचौ-२/कसुरी/कादानो/मपोशि-३६३ सानप+२/८३८७ दिनांक -१३.११.२०१९

**कसुरदाराचे नाव:-** १. मपोशि/३६३ आश्विनी सानप, पोलीस मुख्यालय,अमरावती शहर
२. मपोशि/९६८ प्रियंका काळमेघ, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर
३.मपोशि/१२५१ शालु पवार, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुरी :-**

तुम्ही वर तुमच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे नेमणुकीस असुन तुमची पोलीस मुख्या.अमरावती शहर येथे मुख्य प्रवेशदवाराजळ गार्ड डयुटी लावण्यात आली होती. सदर डयुटी दरम्यान दि. ०३.११.२०१९ रोजी २०.०० वा मा पोलीस आयुक्त सा. कार्यालयातुन बाहेर जात असतांना त्यांना संत्री पहा-यावरील मपोशि/३६३ आश्विनी सानप ही कानामध्ये हेडफोन लावुन मोबाईल बघ्रण्यात मग्न बसलेली आढळुन आली. त्याचप्रमाणे गार्डवरील इतर मपोशि/९६८ प्रियंका काळमेध व मपोशि/१२५१ शालु पवार हया वरिष्ठाची पूर्वपरवानगी शिवाय गार्ड डयुटीवरुन परस्पर स्वमर्जीने गैरहजर राहिल्या असल्याचे निर्देशनास आल्याने सदरची बाब गंभीर असल्याने तुमच्या या बेशिस्तपणाच्या व बेजबाबदारपणाच्या कसुरी बददल **तुम्हास ५००/- रुपये आर्थिक दंड का करण्यात येवु नये.** . याबाबत संदर्भित आदेशान्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती .सदर नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुम्ही स्पष्टीकरण सादर केलेले असुन सदरचे स्पष्टीकरण आम्ही बारकाईने अवलोकन केले असता ते समाधान कारक वाटत नसल्याने आम्ही खालील प्रमाणे अंतिम शिक्षेचे आदेश पारीत करीत आहोत .

## अंतिम आदेश

उपरोक्त कसुर प्रकरणी वर नमुद कसुरदार यांना महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ नियम क्रमांक ३ मधील (२) चे (४) तरतुदी नुसार **५००/- रु आर्थिक दंडाची शिक्षा** करण्यात येत आहे.

००००

# <u>वाढदिवसाच्या हार्दीक शुभेच्छा</u>

सर्व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे नांव पोलीस स्टेशनचे नोटीस बोर्डवर लिहुन हार्दीक शुभेच्छा द्यावयात.

| **अ.क्र.** | **हुददा** | **[illegible]** | **[illegible]. व कर्म. यांचे नांव** | **नेमणुक** | **दिनांक** |
|---|---|---|---|---|---|
| **१** | पोहवा | ७५४ | विनोद चिखलकर | पो.स्टे.फ्रेजरपुरा | १९.०५.२०२० |
| **२** | पोहवा | ७६ | शाम देशमुख | मोपवि | १९.०५.२०२० |
| **३** | पोशि | ३९६ | अविनाश राजनेकर | पो.स्टे.फ्रेजरपुरा | १९.०५.२०२० |
| **४** | पोशि | १६१० | विशाल पंडीत | पो.स्टे.फ्रेजरपुरा | १९.०५.२०२० |

**(लक्ष्मण भोगण )**
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
पोलीस आयुक्त,अमरावती शहर करिता

प्रत,
पत्रव्यवहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक ,आस्थापना शाखा/सीसीटीएनएस कक्ष यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता